॥ अल्पारंभ: क्षेमकर:॥

SINGLE WINDOW SERVICES

# गवाक्ष

......एक विचारमंच !

अंक : ११ वा    जानेवारी २००७


## ॥ येवो समृद्धी अंगणी । वाढो आनंद जीवनी ॥
## तुम्हासाठी याच शुभेच्छा । नववर्षाच्या शुभक्षणी ॥

A.P.J. Abdul Kalam

Rashtrapati Bhavan
New Delhi - 110004

16 November 2006

Dear Shri Prasad Pawar,

Thank you for your letter and the beautiful picture "Mera Desh, Mera Aasma". I appreciate your creative thinking.

My best wishes to you.

Yours sincerely,

(A. P. J. Abdul Kalam)

Shri Prasad Pawar
Muktangan
3,4, Kamal Residency
Behind Patil Lane No.4
College Road
Nashik – 422 005

**सिंगल विंडो सर्व्हिसेस व मुक्तांगणचे हितचिंतक स्नेही श्री. प्रसाद पवार यांची ही कलाकृती ! हे छायाचित्र राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या 'भारत २०२० : नवसहस्त्रकाचा वेध' या पुस्तकातील विचारांवर आधारित आहे. राष्ट्रपतींनी देखील या कलाकृतीची दखल घेऊन पाठविलेला वरील अभिप्राय म्हणजे श्री. प्रसाद पवार यांच्या कलासाधनेचा गौरवच !!**




## संपादकीय

२००६ वर्ष संपतांना सेन्सेक्सने १४००० ची उंची दाखवली. त्यामुळे २००७ च्या सुरवातीला गुंतवणुकदाराच्या मनामध्ये एक प्रश्न नक्कीच येत असणार - ''येथून पुढे आपण नक्की कोठे जाणार आहोत? मला खरंच माझ्या गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळेल का?'' - पूर्वीच्या लेखांमधून आम्ही ज्या महत्त्वाच्या गोष्टी मांडल्या त्याच परत एकदा अधोरेखित करित आहोत. गुंतवणुकीसाठी ही वेळ चांगली किंवा वाईट हा मुद्दा महत्त्वाचा नसून, आपण (गुंतवणुकदार म्हणून) सातत्याने व शिस्तबद्धपणे गुंतवणुक करित आहोत का? हे महत्त्वाचे आहे. गुंतवणुकीसाठी किमान तीन ते पाच वर्षे लागणार नाही, अशीच रक्कम गुंतवावी. तसेच (Systematic Investment Plan) करताना किमान ३ - ५ वर्षे द्यावीत. गुंतवणुकीसाठी जास्तीत जास्त कालावधी देणे हे आपल्याच हिताचे आहे, हे सूत्र कायम ध्यानात ठेवावे.

संपत्ती निर्माण करण्याचे एक शास्त्र आहे. आणि ती एक सातत्याने चालणारी प्रकिया आहे. हि प्रक्रिया घडत असतांना मनात चालबिचल निर्माण होणाऱ्या अनेक घटना घडतील, परंतु त्याकडे दुर्लक्ष करणेच इष्ट. अर्थातच हे सर्व करत असतांना आपल्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेसाठी योग्य असा आरोग्यविमा (Health Insurance), अपघात विमा (Accident Insurance), व आयुर्विमा (Life Insurance) असणे तितकेच जरूरीचे आहे. याचा विसर पडू देऊ नये.

२००७ आपल्यासाठी व आपल्या कुटुंबियांसाठी आरोग्यदायी व लाभदायी ठरावे हीच सदिच्छा।

२००७ आपल्यासाठी व आपल्या कुटुंबियांसाठी आरोग्यदायी व लाभदायी ठरावे हीच सदिच्छा!

**श्री. रघुवीर अधिकारी**

SINGLE WINDOW

The art of being wise is the art of knowing

# 'गुंतवणूकदार आणि मानसिकता'

सर्वसाधारणपणे 'गुंतवणूक' म्हटले की आपल्या डोळ्यापुढे जमिनीत केलेली गुंतवणूक, सोने-चांदी व शेअर्समध्ये केलेली गुंतवणूक इत्यादि प्रचलित प्रकार उभे राहतात व अजूनही ही पैसेवाल्यांची कामे म्हणून सर्वसाधारण गुंतवणूकदार तिकडे वळताना दिसत नाही. मागील पिढीने थोडे-थोडे पैसे वाचवून, प्रसंगानुसार सोने खरेदीवर विश्वास दाखवला व दीर्घकाळाने लग्नकार्य किंवा घरबांधणीप्रसंगी त्याचा थोडाफार हातभारही लागला. तरीसुद्धा पैशाची गरज पूर्णपणे भागविली गेली असेल असे नाही.

आजही अनेक लोकांपुढे गुंतवणूक कशी करावी व ती योग्य वेळेला कशी हाताशी येईल हा यक्षप्रश्न असतो आणि म्हणूनच गुंतवणूकीबाबत योग्य ते मार्गदर्शन व समुपदेशन (Counselling) होणे आवश्यक आहे.

प्रस्तुत लेखात आपण आर्थिक गुंतवणकी बद्दल (Financial Investment) बद्दल काही उपयुक्त माहिती पाहूयात. सोप्या भाषेत सांगायचे तर अशी गुंतवणूक की, ज्यात काही मुदतीसाठी किंवा बेमुदत आपण पैसे गुंतवतो व त्याचे रूपांतर कागदामध्ये (Receipts, Certificates, Bonds) मध्ये होते म्हणजेच ही गुंतवणूक Intangible assets या स्वरूपाची असते. ढोबळमानाने अशा गुंतवणूकीसाठी दोन पर्याय उपलब्ध आहेत. १) Debt. Market (कर्जाऊ स्वरूपाचे). व २) Equity किंवा Capital Market (भांडवली स्वरूपाचे).

Debt. Market म्हणजे सर्वसाधारणपणे स्थिर व्याज देणाऱ्या, ठराविक मुदतीच्या, सरकारी कर्जरोखे, कंपन्यांचे कर्जरोखे व अन्य बचत योजना. त्यात आपण एक प्रकारे कर्ज देतो म्हणून ठराविक दराने व्याज मिळवीत असतो.

याउलट Capital Market मध्ये आपण कर्ज न देता भांडवल पुरवठा करीत असतो व पुरविलेल्या भांडवलाच्या प्रमाणात नफा कमवीत असतो. आपण 'गुंतवणूक' (म्हणजे जमीन खरेदी व सोने-चांदी सोडून) करीतच नाही असे म्हटले तर त्यास आपण सहमत होणार नाही. परंतु ते सत्य आहे. आपण म्हणाल की, 'आम्ही PPF, NSC, Post Office, MIS, जीवन विमा, बँक मुदत ठेवी, KVP, इ. प्रकारात गुंतवणूक केली आहे व करीत आहोत. त्यांनी आम्हाला शाश्वत व्याज परतावा दिलेला आहे.' परंतु त्याचवेळी हे लक्षात घेतले पाहिजे की वरील सर्व पर्याय हे 'बचतीचे' आहेत की 'गुंतवणूकीचे'? याचाच अर्थ बचत व गुंतवणूक हे भिन्न शब्द असून त्याची सरमिसळ होत आहे. बचत व गुंतवणूकीतला मुख्य फरक काय

| बचत | गुंतवणूक |
|---|---|
| १. **कालावधी :** अल्प ते मध्यम कालीन (मर्यादित) | दीर्घकालीन भांडवली वाढ (अमर्यादित) |
| २. **शाश्वती :** आहे | परताव्यात चढ-उतार |
| ३. **तरलता :** (Liquidity) नसते | (Liquidity) असते |
| ४. **महागाईवर मात :** होत नाही. | महागाईवर मात होते |

वरील तुलनेचा उद्देश कोणताही एक प्रकार चांगला किंवा वाईट असे सांगणे हा नसून प्रत्येकाने काही फायदे-तोटे आहेत हे समजून घेणे हे सांगणे, असा आहे.

आजही आपल्या देशात सर्वसाधारण, मध्यमवर्ग व उच्च मध्यमवर्ग आपली गुंतवणूक Debt स्वरूपात म्हणजेच स्थिर दराने व्याज मिळवण्याकरिता करीत असतो व अगदी तुरळक स्वरूपात भांडवली (Equity) गुंतवणूक केली जाते. आपल्या देशात जे जे नवीन तंत्रज्ञान आले. उदा. दूरध्वनी, संगणक, मोबाईल, इंटरनेट इ. ते तंत्रज्ञान याच मध्यमवर्गाचे उचलून धरल्याने विकसित झाले व फोफावले. आपण बदलत्या काळात झपाट्याने होणारे बदल स्वीकारले व आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग ते कधी झाले हे आपणास कळले देखील नाही. अपवाद फक्त गुंतवणूकीचा.

गुंतवणूकीबाबत आपण अजूनही पारंपारिक भूमिकेतून बाहेर पडायला तयार नाही. त्याबाबत अजूनही 'अति सुरक्षित' (over safety) मानसिकता आढळते. त्यातल्या त्यात मराठी गुंतवणूकदार तर 'व्याज किंवा वाढ मिळाली नाही तरी चालेल, फक्त मुद्दल सुरक्षित राहिले पाहिजे' असे ठणकावून सांगतात. जर व्याज नकोच असेल तर भांडवल गुंतवायचेच कशाला ? भांडवल बाजारात काही जणांना बसलेल्या फटक्यांचे 'भांडवल' करीत आपण आपल्या पैशाची वाढ रोखीत असतो. अर्थात यामध्ये कोणाचाही वैयक्तिक दोष नसून त्याला काही कारणेही आहेत.

१. भांडवली बाजार व त्यातील पर्याय (Products) यांच्या सखोल माहितीचा अभाव.

२. परताव्यातील चढ-उतार म्हणजेच शाश्वती नसणे.

३. थोडाही धोका न पत्करण्याची मानसिकता.

आणि सगळ्यात महत्त्वाचे

४. प्रामाणिक व गुंतवणूकदारांच्या बाजूने विचार करणाऱ्या सल्लागाराचा अभाव.

वरील पैकी योग्य सल्लागार जरी आपणास मिळाला तरी बाकीचे प्रश्न सहज सुटू शकतील. जसा चांगला डॉक्टर आपण शोधून काढतो तसा चांगला 'आर्थिक सल्लागार' शोधणे ही काळाची गरज आहे.

प्रस्तुत लेखाचा उद्देश फक्त भांडवली बाजारात गुंतवणूक करावी असा सल्ला देणे अजिबात नसून, आपल्याजवळ असणाऱ्या उपलब्ध पैशांची आपल्या गरजांनुसार Debt व

आहे हे पाहू :

Equity या पर्यायांमध्ये योग्य विभागणी करण्यास आपणाला शिकता यावे हे सांगण्यासाठी आहे. व त्यासाठी गुंतवणूकीचे तंत्र अवगत असणे आवश्यक आहे.

गुंतवणूक नियोजन करताना खालील गोष्टींचा (तंत्रांचा) प्रामुख्याने विचार होतो.

१. गुंतवणूकदाराचे वय,
२. वार्षिक उत्पन्न,
३. त्याच्यावरील आर्थिक जबाबदाऱ्या,
४. गुंतवणूकदाराची उद्दिष्टे (goals) ठरविणे (उदा. शैक्षणिक खर्च, वित्त खर्च, घरबांधणी, निवृत्तीवेतन इ.),
५. उद्दिष्टांनुसार कालावधी निश्चित करणे,
६. कालावधीनुसार व गुंतवणूकदाराच्या वयानुसार उपलब्ध पैशांची Debt व Equity मध्ये विभागणी करणे. (Asset Allocation),
७. गुंतवणूकदाराची धोका पत्करण्याची मानसिक क्षमता जाणून घेणे,
८. गुंतवणूक आराखडा तयार करणे,
९. गुंतवणूकीचा आढावा (Review) घेणे.

बऱ्याच जणांना भांडवल बाजारातील धोक्यामुळे पैसे बुडविण्याची भीती वाटते. त्यामुळे हा 'धोका' नक्की काय आहे हे समजून - उमजून मर्यादित धोका (Calculated Risk) स्वीकारून, आपण आपले पैसे उत्तमरितीने वाढवू शकता. जसे क्रिकेटमध्ये द्रविड, लक्ष्मण, कैफ (Defensive) व सचिन, सेहवाग, धोनी (Attacking) यांचा सुरेख संगम असतो व त्या जोरावर ठेवलेले 'लक्ष' गाठता येते. त्याचप्रमाणे आपल्या पैशाचा 'सुरक्षित' व 'मर्यादित धोका' असे विभाजन करून आपले 'आर्थिक लक्ष' आपणास देखील गाठता येईल.

Fortune Favours the brave असे आपण नेहमी म्हणतो. त्याचप्रमाणे व्यवहारात थोडेसे साहस करून आता 'स्थिरव्याजा' बरोबरच भांडवल पुरवठा करून थोडा 'नफा' ही कमवूयात. Wish u a very happy Investment!

**-संजय दत्तात्रय कुलकर्णी,**
आर्थिक सल्लागार,
सिंगल विंडो सर्व्हिसेस.

## 'सुभाषितरत्नानि'

**भाषासु मुख्या मधुरा दिव्या गीर्वाणभारती ।**
**तस्माद्धि काव्यंमधुरं तस्मादपि सुभाषितम् ॥**

**अर्थ :** सर्व भाषांमध्ये दिव्य अशी संस्कृत भाषा अतिशय मधूर आहे. संस्कृत काव्य तर फारच मधुर आहे. आणि त्या काव्यातील सुभाषिते तर अतिशय मधुर आहेत.

अशा काही मधुर सुभाषितांपैकी काहींची ओळख आपण यापुढे प्रत्येक अंकामध्ये करून घेणार आहोत.

सुभाषित - १

**अनारभ्मो हि कार्याणां प्रथमं बुद्धिलक्षणम् ।**
**प्रारब्धस्य अनागमनं द्वितीयं बुद्धिलक्षणम् ॥**

अर्थ : ( न झेपणारी ) कामे न आरंभिणे हे बुद्धीचे पहिले लक्षण आहे व जे सुरू केले त्याच्या शेवटास जाणे - ते पूर्ण करणे - हे बुद्धीचे दुसरे लक्षण आहे.

सर्व सजीव प्राण्यांमध्ये परमेश्वराने मानवाला दिलेली एक वैशिष्टयपूर्ण भेट म्हणजे 'बुद्धी'. आपल्या बुद्धीचा योग्य तो वापर करून माणूस प्रगतीचा मोठा टप्पा गाठू शकतो. ही बुद्धी वापरताना आपणास जास्तीत जास्त जेवढे शक्य आहे ते करणे व जे अशक्यच आहे त्याच्या वाटेला न जाणे हे बुद्धीचे पहिले लक्षण सांगितले जाते. परंतु जे शक्य आहे ते अपूर्ण स्वरूपात सोडून न देता त्याच्या पूर्णत्वाकडे जिद्दीने जाणे हा आपल्या बुद्धीचा खरा उपयोग आहे आणि हेच बुद्धीचे दुसरे लक्षण आहे.

**सौ. अनघा न. ताटके**

## मुक्तांगण : मुव्ही क्लब

सप्रेम नमस्कार !

मित्रांनो, मुक्तांगणच्या समृद्ध वाटचालीचे आपण सर्वजण साक्षीदार आहात. या वाटचाली दरम्यान प्रत्येक व्याख्यानातून अधिकाधिक उपयुक्त माहिती आपणासमोर आलेलीच आहे व भविष्यातही येत राहील. मुक्तांगणच्या रसिक सदस्यांसाठी आता मनोरंजनाचे आणि मानवी भावभावनांचा वेध घेणारे, एक नवीन दालन उघडीत आहोत. 'मुक्तांगण ; मुव्ही क्लब' द्वारे !!

दकश्राव्य माध्यमांमध्ये चित्रपट हे एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे. चित्रपट व्यवसायामध्ये भारताचे स्थान जरी प्रथम क्रमांकाचे असले तरीहीं बोटांवर मोजण्याइतके काही चित्रपट वगळता, रसिक प्रेक्षकांच्या पदरी निराशाच येते. त्यातूनही हिंदी चित्रपटसृष्टीचा जनमानसावर प्रभाव अधिक आहे. परंतु येथेही निवडकच चित्रपटांची नावे, 'अभिरूची जागविणारे चित्रपट' म्हणून घेता येतील. तेव्हा कलात्मकतेची आवड जोपासू इच्छिणाऱ्या प्रेक्षकांना भारतीय प्रादेशिक चित्रपट अथवा जागतिक चित्रपटाकडे वळण्यावाचून गत्यंतर उरत नाही.

आपण सुरू केलेला मुक्तांगण-मुव्ही क्लब, जागतिक सिनेमाची खिडकी उघडून आपल्यासमोर घेऊन येत आहे, अभिजात- कलात्मक चित्रपटांचा अनोखा खजिना ! सत्यजित राय नेहमी म्हणत असत की, ''मानवी जीवन हाच चित्रपटांचा पाया आहे आणि मानवी जीवन व समाज हे चित्रपटांचे समान सूत्र आहे.'' तेव्हा चित्रपट म्हणजे कला की तंत्र ? चित्रपट म्हणजे मनोरंजन की व्यवसाय ? अशा प्रश्नांमध्ये न अडकता, चित्रपट माध्यमाद्वारे भावनांचा, सामाजिक बदलांचा प्रेरक वेध घेणे, हे जास्त आनंददायी ठरेल.

या मुव्ही क्लबच्या माध्यमातून आपण सर्वजण मिळून ह्या चित्रपट यात्रेत सामील होऊ यात. शेवटी आंद्रे मालरॉक्स् यांनी म्हटल्याप्रमाणे ''सर्वोत्कृष्ट चित्रपटांची निर्मिती तेव्हाच होईल, जेव्हा सर्वोत्कृष्ट व अभिरूची संपन्न प्रेक्षकवर्ग चित्रपटांसाठी प्रेरणास्थान होईल !'' तेव्हा चला, आपल्याला एका अनोख्या विश्वात घेऊन जाणाऱ्या चित्रपटांचा आस्वाद आपण सर्वजण मिळून घेऊयात !!

- ❖ वार्षिक सभासदत्त्व रू. ३६५/- फक्त.
- ❖ २४ ते ३० चित्रपटांचे सादरीकरण.
- ❖ महिन्यातून दोन चित्रपट या प्रमाणे होईल.

अधिक माहितीसाठी संपर्क :

**सौ. रूपाली कुलकर्णी,**
९८२२३३१०७५

# ''गप्पा आजोबांशी''

'आजोबा, आजी सकाळी उठल्यावर जमिनीला नमस्कार करते, याचं कारण काय?' मृणालने विचारले.

'जमिन म्हणजे धरणी. तिला आपण काय म्हणतो?'

'धरणी माता' पराग म्हणाला.

'बरोबर. आपण सकाळी उठल्यापासून धरणीमातेला पदस्पर्श करीत असतो. आपण चालतो, धावतो, खेळतो त्यावेळी आपली पावलं कुठे असतात?'

'जमिनीवर' अद्वैत म्हणाला.

'म्हणजे धरणी मातेला सतत आपल्या पायांचा स्पर्श होत असतो. म्हणून आपण तिला नमस्कार करून म्हणतो, माते मला क्षमा कर.'

'आजोबा, आपण आई-वडिलांना पण नमस्कार करतो' पराग म्हणाला.

'मुलांनो, भारतीय संस्कृतीत नमस्काराला फार महत्त्व आहे. आई वडिलांना आपण परमेश्वरच मानतो. मातृदेवो भव, पितृदेवो भव असे म्हणतो. आता नमस्कार करणे म्हणजे नुसते हात जोडणे नव्हे तर नतमस्तक होऊन त्यांच्या पायाला स्पर्श करणे. ते आपल्या डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद देतात. परीक्षेला जातांना, दसरा, दिवाळी, संक्रांत आदी सणांच्या दिवशी मुले आईवडलांना नमस्कार करतात. याचं कारण काय?'

'आजोबा, तुम्हीच सांगा' अद्वैत म्हणाला.

'आई-वडिलांचे मुलांवरील नि:स्वार्थ प्रेम, त्यांनी मुलांसाठी केलेला त्याग, आपल्या मुलाने मोठं व्हावं, त्याची प्रगती व्हावी म्हणून त्यांची सतत चाललेली धडपड याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे ही नमस्कार करण्यामागची भावना असते. शिवाय त्यांचं वय, त्यांची वैचारिक परिपक्वता याविषयी आदराची भावना असते. त्यांच्या समृद्ध अनुभवाचा मुलांना फायदा होत असतो. प्रेम, त्यांचा आशीर्वाद सतत आपल्या पाठीशी रहावा ही इच्छा असते. नमस्कारात नम्रता असते. नम्रता हा मोठा सद्गुण आहे. नम्रता म्हणजे वैचारिक परिपक्वता. नमस्काराने कौटुंबिक नात्याची वीण घट्ट होते. आपल्या यशाचं श्रेय ज्येष्ठांना देणं ही नम्रताच.'

'नमस्कारामागची भावना तुम्ही किती छानपणे स्पष्ट करून सांगितली.' मृणाल म्हणाली.

'आपण आईवडिलांप्रमाणेच आपल्यापेक्षा वडील असणारांना नमस्कार करतो. त्यांचा पण आशीर्वाद आपल्या पाठीशी असावा ही भावना असते. अशा सर्व आशीर्वादांची शिदोरी आणि परमेश्वराची कृपा घेऊन आपण यशोमंदिराकडे जात असतो, त्यातून आपणाला प्रेरणा मिळते, प्रोत्साहन मिळते.'

'आजोबा आपण प्रथम देवाला नमस्कार करतो,' पराग म्हणाला.

'बरोबर आहे. परमेश्वर जगन्नियंता आहे. तो सुखकर्ता, दु:खहर्ता आहे आणि आपल्या नमस्काराला समर्पणाची भावना असते. परमेश्वर आपल्या यशाचा कारक असतो. परमेश्वरा, तुझ्या कृपेने यश मिळाले. पुढेही असेच यश मिळू दे अशी आपण प्रार्थना करतो. म्हणूनच जीवनात यशस्वी झालेली थोर माणसे म्हणतात, 'ही सर्व त्याची कृपा.'

'नमस्कारात किती अर्थ भरला आहे' अद्वैत म्हणाला.

'बरोबर आहे. पण कुठलेही यश परिश्रम केल्याशिवाय मिळत नाही. परीक्षेत चांगले मार्क मिळवायचे असतील तर खूप अभ्यास करायला हवा आणि नंतरच यश मिळविण्यासाठी परमेश्वराची प्रार्थना करायची, थोरांचा आशीर्वाद घ्यायचा. जे स्वत:ला मदत करतात, म्हणजे खूप परिश्रम घेतात, त्यांना परमेश्वर मदत करतो.'

'आजोबा, नमस्काराचे महत्त्व समजले.' मृणाल म्हणाली.

'आजोबा, आम्ही तुम्हाला नमस्कार करतो.' पराग म्हणाला.

'कठोर परिश्रम करा. यश तुमचेच आहे. माझा आशीर्वाद तुमच्या पाठीशी आहे. जीवनात सुखी व्हा.'

असे म्हणून आजोबांनी सगळ्यांना आशीर्वाद दिला.

**श्री. बा. ल. शुक्ल**

|| अल्पारंभ: क्षेमकर: ||

SINGLE WINDOW SERVICES

खाजगी वितरणासाठी

Comprehensive Financial Consultancy

सर्वसमावेशक आर्थिक सल्लागार

-:Head Office :
3,4, Kamal Residency, Behind Patil Lane No.4,
College Road, Nashik - 422 005.
Ph.: (0253) 2579993, 2317867, 2309480.
Website : www.singlewindowservices.com

-: Indira Nagar :-
Sandeep Deshmukh
Mobile : 9822408093

-: Ahmednagar Branch :-
SANJAY KULKARNI
Mobile : 9860046338.

-: Indore Branch :-
Amlendu Sharma
Mobile : 9826211439

-: Jalgaon Branch :-
Deepak Kulkarni

-:Chalisgaon Branch :-
Sachin Purkar

Mobile : 9881242210
Mobile : 9373900533 /9226174249

SINGLE WINDOW SERVICES
The sum total of all ideas of help is God.